# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(सोमवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (५)] —**

(१) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाच्या २९ प्रमुख विभागांमध्ये सरळसेवा व पदोन्नतीच्या मिळून तब्बल दोन लाख १९३ जागा रिक्त असून त्यात तब्बल ४६ हजार ९६२ जागा जिल्हा परिषदांमधील असणे, रिक्त पदांमुळे नागरिकांना मिळणाऱ्या शासकीय सेवा प्रभावित होत असून तहसिल कार्यालयात साध्या उत्पन्नाच्या दाखल्यासाठीही विद्यार्थी व पालकांना किमान दोन आठवडे प्रतिक्षा करावी लागत असणे, राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली असून तरुणांना नोकऱ्यांची प्रतिक्षा असल्यामुळे मात्र शासनाच्या नव्या नोकरभरतीऐवजी आऊटसोसिंग, कंत्राटी पध्दतीवर अधिक जोर असल्याचे दिसून येणे, त्यातूनच निवृत्तांना पुन्हा कंत्राटी तत्वावर सेवेत सामावून घेतले जात असणे, सदरची माहिती ही फक्त राज्यातील शासकीय विभागांची व जिल्हा परिषदांमधील अधिकारी/कर्मचारी यासंदर्भातील असणे, तथापि त्यामध्ये नगरपंचायती, नगरपरिषदा, महानगरपालिका, शासन अधिनस्थ मंडळे व महामंडळे, उद्योग व इतर विभागातील माहिती समाविष्ट केली नसल्याचे निदर्शनास येणे, सरळसेवा भरतीबाबतही राज्य लोकसेवा आयोगाची संथगती दिसून येत असल्यामुळे साहजिकच कॉललेटर, प्रशिक्षण, परिवीक्षाधीन कालावधी याला बराच वेळ लागत असणे, राज्यातील बेरोजगारांची वाढलेली संख्या विचारांत घेतां, शासनाने नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे गरजेचे असणे व त्यासाठी शासनस्तरावर रिक्त असलेली पदे भरण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची वा केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"२०११ च्या जनगणनेनुसार पंढरपूरची लोकसंख्या ९९ हजार तर उपनगरी भागाची लोकसंख्या १० हजाराहून अधिक असणे, तसेच विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात

घेता शहरातील सांडपाण्यावर दैनंदिन प्रक्रिया करणारा १५ MLD क्षमतेचा प्रकल्प वाढत्या लोकसंख्येला अपुरा ठरत असणे, परिणामी दररोज लाखो लिटर्स सांडपाणी, प्रक्रिया न करताच थेट चंद्रभागा नदीत जाऊन मिसळत असणे, सद्या शहरात दररोज १३ ते १४ MLD सांडपाणी वापरून सोडले जात असणे, शनिवार, रविवार, एकादशीच्या दिवशी हेच सांडपाणी १५ ते १८ MLD पर्यंत वाढत असणे, अशावेळी हे सांडपाणी प्रक्रिया न करताच पुष्पावती नदी (गोपाळपूर) आणि मलपे ओढा (इसबावी) येथून थेट चंद्रभागा नदीला जाऊन मिळत असणे, या सांडपाण्यावरील प्रक्रियेसाठी शहरातील जुन्या पाईप लाईन बदलणे, ३ ठिकाणी पंपहाऊस उभा करणे, प्रत्येकी ५ MLD पाणी प्रक्रियेचे २ प्रकल्प उभा करणे, यासाठी ७७ कोटी रुपयांची गरज असणे, पंढरपूर नगरपालिकेची मुदत संपल्याने त्यावर प्रशासक असणे, परिणामी सांडपाणी प्रक्रियेचा ७७ कोटींचा प्रस्ताव नगर विकास खात्याकडे पाठविण्यात आलेला नसणे, परिणामी दररोज लाखो लिटर मैला मिश्रित सांडपाणी थेट चंद्रभागेत मिसळून पंढरपूर शहर व उपनगरांना दुषित पाण्याचा पुरवठा होणे याकडे प्रदुषण नियंत्रण मंडळाचे साफ दुर्लक्ष असणे, त्यातून स्थानिक लोक व वारकरी विविध आजारांना बळी पडणे, यामुळे पंढरपूरवाशिय व वारकरी यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, यामुळे पंढरपूर शहरातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आराखडयास गती देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री अंबादास दानवे,** आमश्या पाडवी, दुष्यंत चतुर्वेदी, शशिकांत शिंदे, अमरनाथ राजूरकर, सतिश चव्हाण, विक्रम काळे, अमोल मिटकरी, सचिन अहिर, सुनिल शिंदे, विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग मृत्यूचा सापळा बनत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, दिनांक १४ ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या भीषण अपघातात शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याने या महामार्गाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर येणे, मुंबई - पुणे महामार्गावरील अपघात आणि ते रोखण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न आदी मुद्दे ऐरणीवर येणे, पुणे-मुंबई एक्स्प्रेस-वेवर (द्रुतगती मार्ग) गेल्या दीड वर्षात तीनशे अपघातांमध्ये १२५ प्रवाशांचा मृत्यू झाला असणे, तर २११ जण गंभीर जखमी झाले असणे, सन २०२२ च्या ऑगस्ट महिन्यांपर्यंत ३० अपघात घडून ४० जणांचा मृत्यू झालेला असणे, वाहनांसाठी घाट परिसरात प्रति तास ५० कि.मी. तर अन्य ठिकाणी प्रति तास १०० कि.मी. वेगमर्यादा निश्चित केलेली असताना वाहनचालकांकडून

अग्रिम प्रत

वेगमर्यादेचे पालन करण्यात येत नसणे, सीटबेल्ट न लावणे असे अनेक प्रकार या द्रुतगती मार्गावर दिसून येणे, त्याचप्रमाणे अपघात झाल्यास तातडीने अॅम्ब्युलन्स सेवा उपलब्ध होत नसल्याने अपघातग्रस्तांना त्वरीत उपचार मिळत नसल्याने मृत्यू संख्येत होत असलेली वाढ, परिणामी भरधाव वेगामुळे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात या महामार्गावर अपघात नेहमीच होते असणे, वेग मर्यादेचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात येत असली, तरी वाहनचालक कारवाईस जुमानत नसणे, याव्यतिरिक्त निरनिराळ्या प्रकारच्या वाहनांना आखून दिलेल्या मार्गिकांचा वापर न करता वाहने बेदरकारपणे चालविण्यात येणे, हे हि वाढत्या अपघाताचे मुख्य कारण असणे, त्यामुळे देशातला पहिला एक्स्प्रेस हायवे अशी ओळख असलेल्या या महामार्गावरून प्रवाशांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागणे, परिणामी या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशी आणि वाहनचालकांत पसरलेले भीतीचे साम्राज्य, यास्तव मुंबई-पुणे महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यासाठी तसेच महामार्गावर ठराविक अंतरावर ट्रॉमा केअर केंद्र उभारण्याबाबत शासनाने तातडीने हाती घ्यावयाच्या उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, अब्दुल्ला खान दुर्राणी, अमरनाथ राजूरकर, अंबादास दानवे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सन २०१४ साली राज्य शासनाने गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुका क्रिडा संकुलासाठी १ कोटी ५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करुन सदर काम हे १२ टक्के कमी दराने मे.युनाइटेड कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना देण्यात आले असणे, सदर कामात संरक्षण भिंत रु.९.०० लक्ष मीटर ऐवजी ४०० मीटर ट्रॅक रु. ८.०० लक्ष बॅडमिंटन हॉल कोटींग रु. ३.०० लक्ष ८८ हजार असे एकुण रु. १,०६,१७,३७७ कार्यारंभ आदेश देण्यात आले तसेच सदर काम हे बारा महिने मुदतीचा आत करण्याबाबत संबंधीत ठेकेदारास आदेशित करण्यात आले असणे, सदर कामाचे कार्यारंभ आदेश देऊन आज तारखेपर्यंत ८ वर्षे उलटून गेल्यानंतर देखील सदर क्रिडा संकुलाचे काम अपूर्ण स्वरुपात असून या संदर्भात जनतेच्या वाढत्या तक्रारी असणे, क्रिडा संकुल समितीची बैठक दिनांक ३१ जुलै, २०२१ रोजी घेण्यात आली व या बैठकीत सदर क्रिडा संकुलाच्या आतापर्यंत झालेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला असणे, त्यानुसार झालेला संपूर्ण कामाचे संयुक्त मोजमाप पाहणी अहवाल घेणेबाबत बैठकीत सर्वानुमते मान्यता दिली होती. त्यानुसार सदर समितीने दिनांक ०४ ऑगस्ट, २०२१ रोजी

पाहणी अहवाल दिला असून सदर अहवालानुसार मंजूर कार्यारंभ आदेशानुसार मंजूर रु. ८५,२९,१७२ तसेच वाढीव कामाची रक्कम रु.२० लक्ष ८८ हजार असे एकत्रित रु. १,०६,१७,३७७ एवढी रक्कम कामासाठी मंजूर करण्यात आलेली होती, यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधीत ठेकेदारास रु. ९७.०० लक्ष अदा केले असणे, मात्र सदर क्रिडा संकुलात मंजूर असलेले खो-खो ग्राऊंड, बास्केटबॉल कोर्ट, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक शौचालय यासह इतर अनेक कामे झालेली नसणे, तसेच झालेली कामे ही देखील अपूर्ण असणे, परंतू सदर कामाचे बिल अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमताने काढले असल्याने संबंधीत अधिकारी व ठेकेदार यांचेवर कारवाई करण्यासाठी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(५) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

" राज्य शासनाने केंद्रीय औद्योगिक नीतीचा पुरेपूर फायदा घेण्यात येऊन भांडवलदारांना प्रचंड सवलती देऊन औद्योगिक गुंतवणुकीला प्रोत्साहित करणे, उद्योगांना स्वस्तात मजूर व स्वस्तात कच्चा माल मिळावा यासाठी शेतकऱ्यांवर शेतमालाला कधीही जिल्हाबंदी, राज्यबंदी तर कधी निर्यातबंदी सारखे अत्यंत अन्यायकारक नियंत्रण लादणे, जमीन धोरणाचे नियंत्रण आणणे, परिणामी शेतातून होणाऱ्या उत्पन्नावर नुकसान होऊन शेतकऱ्यांवर कर्जाचे डोंगर निर्माण होणे, हरितक्रांतीमुळे कृषी क्षेत्रात उत्पादक प्रचंड प्रमाणात वाढले, मात्र राज्य शासनाच्या सापत्न आर्थिक नीतीमुळे या शेती उत्पन्नातून उत्पन्न निर्माण झाले नाही पण कर्ज निर्माण होणे, परिणामी राज्यातील शेतकरी आगतिकतेने कर्जबाजारी होऊन आत्महत्याच्या उंबरठ्यावर पोहोचणे, राज्यात दररोज कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करीत असणे, त्यामुळे शासनाने यापुढे नव्याने शेती निधी जाहीर करून तिची परिणामकारक अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असताना याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीची कारवाई व उपाय योजना करण्याची निर्माण झालेली आवश्यकता व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (६) ते (१२)] —**

(६) **श्री.जयंत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक १ सप्टेंबर २००५ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांचेकडे पनवेल तालुक्यातील धोधाणी या आदिवासीवाडी जवळून धोधाणी-माथेरान रोप-वे (रज्जूरथ) मार्ग शासनाने सुरू करावा असा प्रस्ताव श्री. सुधाकर लाड, रा.सुकापूर, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेला असणे, महाराष्ट्र शासनाने धोधाणी-माथेरान रोप-वे प्रकल्पाला मान्यता दिलेली असून एमएमआरडीएनेही सदर प्रकल्पाला मंजूरी दिलेली असून सदर प्रकल्पाला अंदाजे १०० कोटी रूपये खर्च अपेक्षित असणे, मुंबईजवळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील निसर्गरम्य माथेरान या प्रसिध्द थंड हवेच्या ठिकाणी सातत्याने होत असलेल्या अतिवृष्टीचा फटका बसत असल्यामुळे रेल्वे मार्गावर मोठ-मोठ्या दरडी कोसळणे, रेल्वे मार्गाखालील मातीची धुप होणे या कारणांमुळे माथेरानची मिनी रेल्वे सातत्याने बंद पडणे, वाहनांसाठी असलेला नेरळ-माथेरान रस्ता हा दस्तूरीनाका पर्यंत खाजगी वाहनांना परवानगी असल्याने माथेरानला जाण्यासाठी मिनी रेल्वे मार्गाशिवाय दुसरा पर्याय नसणे, त्यामुळे माथेरानला जाणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत घट झाली असणे, निसर्गरम्य माथेरान या देश-विदेशांतील पर्यटकांना आकर्षण असलेल्या पर्यटनस्थळी जाण्यासाठी भविष्याचा विचार करता पर्यायी मार्ग म्हणून माथेरान डोंगराच्या कुशीत असलेल्या पनवेल तालुक्यातील धोधाणी ते माथेरान असा रोप-वे (रज्जूरथ) मार्ग करण्याचा शासनाने विचार करणे आवश्यक असणे, महाराष्ट्रातील एकमेव असा किल्ले रायगड रोप-वे प्रकल्प जोग इंजिनिअरिंग कंपनीने उभारलेला असून जोग इंजिनिअरिंग कंपनीसारख्या रोप-वे उभारण्याचा अनुभव गाठीशी असलेल्या कंपनीच्या माध्यमातून आणि खाजगीकरणाच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाला धोधाणी-माथेरान रोप-वे मार्ग सुरू करणे सहज शक्य होणे, सबब धोधाणी-माथेरान रोप-वे मार्ग सुरू केले तर महाराष्ट्रातील एकमेव किल्ले रायगड रोप-वे प्रमाणे फक्त ५ मिनिटांत धोधाणीवरून माथेरानला जाता येणे शक्य होणे, पनवेल ते माथेरान रस्त्याची योजना गेली अनेक वर्षे शासनाकडे प्रलंबित असणे, पनवेलपासून २० कि.मी अंतरावर असलेल्या धोधाणीपर्यंत गेलेला रस्ता पुढे माथेरानला नेण्याचा शासनाचा विचार असणे, धोधाणी आदिवासीवाडीपासून माथेरानसारख्या उभा कडा असलेल्या दुर्गम डोंगरावर रस्ता करणे इतके सोपे नसल्यामुळे पनवेल-धोधाणी मार्गे माथेरान या रस्त्याची योजना गेली अनेक वर्षे रखडलेली असणे, माथेराच्या कुशीत असलेल्या निसर्गरम्य धोधाणीपर्यंत रस्त्याचे रूंदीकरण करून धोधाणी-माथेरान रोप-वे असा मार्ग तयार केल्यास नागरिकांसह पर्यटकांना पनवेल-धोधाणी मार्ग माथेरानला जाणे जलद व सुखकर होणे शक्य असणे,

अशुद्धित प्रत

सदर रोप-वे प्रकल्पामुळे अनेक उद्योग करण्याची इथल्या आदिवासींना संधी उपलब्ध होईल तसेच विकासापासून शेकडो वर्षे वंचित असलेल्या आदिवासींच्या विकासाला पोषक वातावरण तयार होईल व या परिसरात नवीन पर्यटन क्षेत्र विकसीत होईल व त्या अनुषंगाने विविध उद्योगधंदे या परिसरात सुरू करणे शक्य असणे, सबब धोधाणी-माथेरान रोप-वे (रज्जूरथ) मार्ग प्रकल्पास मान्यता देऊन सदर रोप-वे मार्ग सुरू करण्यात यावा, यासाठी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

(७) **प्रा.राम शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक १४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास कमल सिंघ व त्याचा सोबत असलेले काही सहकारी यांनी नगर जिल्ह्यातील गावागावात जाऊन लोकांना पैशाचे खोटे आमिष दाखवून अनधिकृतरित्या धर्मांतरण केल्याची बाब उघडकीस येणे, राहुरी येथील प्रगती विद्यालय आणि ब्राम्हणी येथे मोठ्या प्रमाणात स्थानिक लोकांचे धर्मांतर करून श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे पुढील कार्यक्रम नियोजित केलेला असणे, तसेच याबाबत अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी पोलीस स्टेशनमध्ये अनधिकृत धर्मांतरासंदर्भात विविध संघटनाच्या पाठपुराव्यामुळे दिनांक १५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास श्रीमती मीराबाई सुभाष हरेल यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला असून अद्याप पोलीस विभागाकडून कोणतीही कारवाई केलेली नसणे, तसेच संबंधित आरोपी कमल सिंघ यांनी अहमदनगर जिल्ह्यात धर्मांतरासाठी ७५० कोटी रुपये आणले असून कमल सिंघ यांच्या विरुद्ध जो आवाज उठवेल त्याच्याविरुद्ध त्यांच्या माणसाकडून आणि स्थानिक पोलिसांकडून 'atrocity' गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात येणे, यासंदर्भात आरोपीला मदत करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री यांनी आरोपी विरुद्ध कारवाई करु नये असे निर्देश पोलीस प्रशासनाला दिलेले असणे, याबाबत राहुरी पोलीस स्टेशनचे प्रभारी प्रताप दराडे आणि तपास अधिकारी यांनी आरोपी कमल सिंघ यांचा कडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतलेले असणे, आत्तापर्यंत शासनाने पोलिसांविरुद्ध व दोषींविरुद्ध कोणतीच कारवाई केलेली नसणे, या गुन्हयांसंदर्भात उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अप्रकाशित

"परभणी जिल्हयातील पाथरी तालुक्यातील डाकूपिंपरी येथे अधिकारी व वाळू तस्कर यांनी संगनमत करीत शासनाचे कोटयावधी रूपयाचे आर्थिक नुकसान करणे, परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील डाकू पिंपरी येथील वाळू गटाचा लिलाव झालेला असणे, वाळू लिलाव धारक हे जिल्हाधिकारी परभणी यांनी दिनांक १ फेब्रुवारी, २०२२, रोजीच्या जा. क्र. २०२२/ महसूल/ गौ.ख/ प्र.क्र. ०१ प्रमाणे नमूद केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन करत शासनाच्या गौण खनिजाची लूट व आर्थिक नुकसान करत असणे, लिलावधारकास या गौणखनिज घोटाळयात पाठीशी घालण्यासाठी काही स्थानिक महसूल अधिकारी हे आर्थिक तडजोड करून संगनमत करीत असणे, व शासनाच्या नुकसानीस कारणीभूत ठरणे, वाळू घाट लिलाव प्रकरणी जिल्हाधिकारी परभणी यांनी डाकू पिंपरी तालुका पाथरी जिल्हा परभणी येथील गट क्रमांक १२ मधून ६४३१ ब्रास वाळू उत्खननाबाबत परवानगी दिलेली असणे, १.८२ हेक्टर क्षेत्रफळ मधून ५२० मीटर लांबी, ३५ मीटर रुंदी व एक मीटर खोली अशा परिमाणा प्रमाणेच वाळू उत्खनन करणे बंधनकारक असणे, तसेच उत्खनन करण्यापूर्वी तालुका भूमि अभिलेख यांच्या कार्यालयामार्फत उत्खनन क्षेत्राचे सीमांकन निश्चित करून घेणे व त्या परवाना क्षेत्रात खांब (स्तंभ) उभारणे त्या क्षेत्रात तार फेसिंग करून त्या आतीलच वाळू उत्खनन करणे बंधनकारक असणे, तसेच ठेकेदाराचे नाव, पत्ता नमूद असलेला ठळक फलक त्या जागी लावणे नियमाप्रमाणे असणे त्यांचे कुठेही पालन करण्यात आलेले नसणे, कुठेही खांब, तार फेंसिंग नसणे, सगळ्या नदीपात्रातून सर्रासपणे नियमभंग करीत उत्खनन करण्यात येणे, वाळू उत्खनन केवळ हातानेच करावी तसेच वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसीबी, सक्शन बोट किंवा इतर कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर करण्यात येऊ नये, तसेच कोणतेही मोठी वाहने नदीपात्रात नेता येणार नाहीत, केवळ ट्रॅक्टर, ट्रॉली द्वारे वाळू डेपो पर्यंत वाळू वाहतूक करून त्याचा मुख्य रस्त्यावर डेपो करावा असा नियम असतानाही सर्रासपणे नदीपात्रात मोठी-मोठी वाहने, ट्रक्स, जेसीबी, पोकलेन, लोडिंग ट्रक नदीपात्रात नेऊन वाळू उपसा व वाहतूक करण्यात येणे, वाळू गटात सीसीटीव्ही बसविणे व त्यांचे २४/७ असे सलग सीसीटीव्ही फुटेज छायाचित्रण करावे व त्याचा एड्रेस जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना देणे बंधनकारक असणे जर सीसीटीव्ही फुटेज खंडित किंवा बंद ठेवला किंवा केला असेल तर त्याबाबत दंड आकारण्यात यावा याबाबत जिल्हाधिकारी परभणी यांनी नियमा प्रमाणे अटी व शर्तीत नमूद केलेले असणेअसे असतानाही कुठेही सीसीटीव्ही बसवलेले नाहीत किंवा त्याचे

सलग छायाचित्रण जिल्हाधिकारी परभणी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसणे. उत्खननाचे अधिकृत परवानगी असलेल्या गट क्रमांक १२ ऐवजी परवानगी नसलेल्या नदी पात्रामधील परिसरातून सुद्धा अनधिकृतपणे वाळूचे उत्खनन करून सुमारे २५ हजार ब्रास पेक्षा जास्त वाळूचे अवैध उत्खनन करून चोरी करण्यात येणे, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनासोबत e-TP वाहतूक पास असणे बंधनकारक करण्यात आलेले आहे परंतु स्थानिक महसूल प्रशासन अशा कोणत्याही पासची तपासणी करत नसल्याने केवळ २ किलोमीटर अंतरावर असलेल्या बीड जिल्हा हद्दीत अश्या चोरीच्या वाळूचे वाहतूक व विक्री केली जाणे, वरील सर्व प्रकरणांची, नियम भंगाची व आर्थिक नुकसान / घोटाळ्याची दक्षता व भरारी पथकामार्फत जायमोक्यावर पावसाळयापूर्वी (ON THE SPOT) जाऊन ड्रोन कॅमेरा व ETS मशीनने प्रत्यक्ष तपासणी करून दोषी कंत्राटदारांची मालमत्ता जप्त करून आर्थिक दंड वसूल करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०२२ दरम्यान मुख्य सचिव यांच्याकडे ईमेलव्दारे करणे, परंतु त्यांच्या स्तरावरून कोणतीही सक्षम कारवाई न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री प्रसाद लाड,** प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ. परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याला ७२० किलोमीटरचा सागरी किनारा लाभला असून राज्याच्या किनारपट्टीवर ७ सागरी जिल्हे असणे, सागरी किनाऱ्यांवरील भागात ट्रॉलिंग, पर्ससीन, बॅगनेट, गिलनेट, हुकलाइन अशा विविध पद्धतीने मासेमारी करण्यात येत असणे, कोकणात सागरी मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असल्याने साधारणपणे चार लाख मच्छीमार कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून असणे, मत्स्य व्यवसाय हा कृषीपूरक व्यवसाय असल्याचे यापूर्वीच सरकारने मान्य केले असणे, तसेच या व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असून परकीय चलनही प्राप्त होत असणे, मत्स्यव्यवसायाकरिता मच्छिमारांना नौका बांधणीसाठी मोठ्याप्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावी लागत असून नियमितपणे जाळी, नौका दुरुस्ती, नौकेवरील साहित्य, सामुग्री दुरुस्ती, खलाशी, कर्मचारी यांचे वेतन, डिझेल, बर्फ, रेशन यावर आवर्ती खर्च करावा लागत असणे, मच्छीमारांची उत्पन्नाची क्षमता लक्षात घेता त्यांना कर्जाऊ रक्कम उभारण्याशिवाय पर्याय नसणे, मच्छीमारांना अनेक वेळा नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत असून गेल्या दोन-तीन वर्षात 'क्यार',

अस्वाक्षरित प्रत

'महा', 'निसर्ग', 'तौक्ते' अशा चक्रीवादळांमुळे व दरवर्षी २ महिने व्यवसायबंदीमुळे मच्छिमारांचे उत्पन्न बुडून बोटी, नौका नादुरुस्त किंवा पूर्णपणे नष्ट झाल्या असणे, शासनामार्फत शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याजदराने पीक कर्ज दिले जात असले तरी मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीला अधिकृत दर्जा मिळाला नसल्यामुळे त्यांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज मिळत नसणे, त्यामुळेच मच्छीमारांकडून मत्स्यव्यवसायाला मत्स्यशेतीचा दर्जा द्यावा, अशाप्रकारची मागणी सातत्याने शासनाकडे केली जात असणे, या संदर्भातील प्रस्ताव मत्स्यव्यवसाय आयुक्तांकडून राज्य शासनाला सादरही झाला असणे, तसेच, मासेमारीला मत्स्य शेतीचा दर्जा द्यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाला वारंवार केली असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(१०) **श्री.अंबादास दानवे,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अनिकेत तटकरे, अमोल मिटकरी, आमश्या पाडवी, विक्रम काळे, बाळाराम पाटील, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बाल आणि माता यांच्या आरोग्यांसंबंधी शासनाच्या पातळीवर सुमारे डझनभर योजना राबविण्यात येत असतांनाही मेळघाटात कोवळी पानगळ सुरु असल्याची धक्कादायक बाब माहे ऑगस्ट, २०२२ रोजी च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास उघडकीस आलेली असणे, माहे एप्रिल ते जून या तीन महिन्यांच्या कालावधीत शून्य ते सहा वर्षाच्या जवळपास ५३ बालकांचा आणि १९ अर्भकांचा मृत्यू झालेला असणे, आरोग्य विभागाच्या अहवालानुसार मेळघाटात सर्वसाधारण श्रेणीत अंदाजे ३२ हजार ५७६, तीव्र कुपोषित (सॅम) ४०९ तर मध्य कुपोषित (मॅम) श्रेणीत अंदाजे ३ हजार ३४६ बालके असल्याचे निदर्शनास आलेले असणे, मेळघाटात कुपोषित बालके, गर्भवती तसेच स्तनदा मातांना बालरोग आणि स्त्री रोग तज्ञांची सेवा उपलब्ध करुन देण्यास शासन स्तरावरुन होत असलेली दिरंगाई, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या स्त्रीरोग तज्ञ कार्याच्या ठिकाणी पोहोचत नसणे किंवा आठवड्यातून २-३ दिवस हजेरी लावत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, स्थानिकांकडून मेळघाटातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बालरोग तज्ञ, स्त्रीरोग तज्ञांची कायमस्वरुपी नेमणूक करावी अशी होत असलेली मागणी, कोवळी पानगळ थांबविण्यासाठी शासनाने करावयाची तातडीने उपाययोजना व याबाबत शासनाची भुमिका."

अस्सुधारित प्रत

(११) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहर आणि उपनगरात वास्तव्य करणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना शिधावाटप दुकानांत कधीच पूर्ण धान्य मिळत नसल्याची गंभीर बाब माहे ऑगस्ट, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास समोर येणे, त्यामुळे सामान्य मुंबईकर जनता मेटाकुटीस आलेली असणे, मुंबई आणि उपनगरात अनेक शिधापत्रिकाधारकांकडे केवळ नावाला शिधापत्रिका असणे, मुंबई व उपनगरातील सुमारे दीड ते दोन लाख शिधापत्रिका कार्ड सद्यस्थितीत बंदवस्थेत असणे, सदर कार्ड पुनश्च सुरु करण्यात नागरिकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागणे, गत सात ते आठ महिन्यांपासून याबाबतची ऑनलाईन सेवा पूर्ण क्षमतेने कार्यरत नसणे, त्यामुळे शिधा मिळण्यासाठी शिधापत्रिका धारकांना आधारकार्ड क्रमांक सादर करण्यासाठी देण्यात आलेली दि. ३० जून, २०२२ पर्यंतच्या मुदतीत वाढ करण्याची असलेली नितांत आवश्यकता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी मुंबई व उपनगरातील गोरगरीब शिधापत्रिकाधारकांत शासनाप्रती पसरत चाललेला असंतोष आणि नाराजीची भावना, यास्तव आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहर आणि उपनगरातील शिधावाटप दुकानात पुरेसा शिधा उपलब्ध करून देण्यासह बंद असलेली शिधापत्रिकाकार्ड पुनश्च सुरु करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना येत असलेल्या अनंत अडचणी दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **श्री.अमरनाथ राजूरकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नांदेड जिल्हयात सोयाबीनच्या उभ्या पिकावर गोगलगाईंचा प्रादुर्भाव झाला असून शेतातील उभे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑगस्ट,२०२२ च्या तिस-या आठवडयात निदर्शनास येणे, याशिवाय येथे शेतातील भाजीपाल्यावरही गोगलगाईचा प्रादुर्भाव होणे, तसेच हिरव्या अळयांनीही पिके फस्त केली असणे, आधीच अतिवृष्टीमुळे पिके धोक्यात असणे, त्यात आता गोगलगाई व अळयांनी पिकांवर आक्रमण केल्यामुळे येथील शेतकरी पुन्हा संकटात सापडणे, त्यामुळे आता येथे सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट निर्माण होण्याची शक्यता यावर उपायोजना म्हणून येथील शेतकऱ्यांनी सोयाबीन व इतर पिकांवर महागडी औषधे फवारणे, मात्र त्याचा उपयोग न होणे, त्यामुळे आता पिकांचा उत्पादन खर्चही निघेल की नाही या चिंतेत येथील शेतकरी असणे, यामुळे या शेतपिकांच्या

अप्रकाशित प्रत

नुकसानीचे शासनाने तातडीने पंचनामा करुन बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देणे आवश्यक असतानाही त्यावरील कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब परिणामी येथील शेतकऱ्यांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे.**

**दोन** : **कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे** —

**(१)** **मुख्यमंत्री** : "शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(२)** **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(क)** "कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा अडतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे सत्तावन्नावा व अठावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(३)** **कृषी मंत्री** : **(क)** "महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांचा

असुधारित प्रत

सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०१९-२०२० या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०१६-२०१७, ते सन २०२०-२०२१ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा, एकेचाळीसावा, बेचाळीसावा, त्रेचाळीसावा व चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे."**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **श्री.नागोराव गाणार**, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रविण दरेकर, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री रामदास आंबटकर, रमेशदादा पाटील, प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात शालेय बस आणि व्हॅन मधून होणारी विद्यार्थ्यांची वाहतूक असुरक्षित असल्याचे माहे ऑगस्ट २०२२ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, शाळेसाठी वापरण्यात येणाऱ्या हजारो शालेय व्हॅन वाहनांची रचना नियमांना झुगारून करण्यात आले असून बहुतांश वाहनांमध्ये अग्निशमन यंत्रणेचा, वैद्य योग्यता प्रमाणपत्राशिवाय क्षमतेने अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक बहुतांश ठिकाणी केली जात असणे, अनेक शालेय व्हॅन आणि बस नियमावली मधील तरतुदींचा भंग करून विद्यार्थ्यांची धोकादायकरीत्या वाहतूक केली जात असणे ,राज्यभरातील

अग्रिम प्रत

शालेय व्हॅन आणि बससाठी आवश्यक असणारे परवाने नसणे, वेग नियंत्रणा बाहेर असणे , आसन क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक व वैद्य योग्यता प्रमाणपत्र नसलेली वाहने, वैद्य विमा प्रमाणपत्र नसणे ,वाहनात परिचारक नसणे ,वाहनांचे लोकेशन न मिळणे, सीसीटीव्ही न बसवणे, अग्निशामन सुविधा अशा अनेक समस्या त्याचबरोबर व्हॅन व बससाठी जे कर्मचारी सतत कार्यरत असतात त्यांना मिळणारा मोबदलाही किमान वेतनापेक्षा कमी असणे, तसेच या सर्व कर्मचाऱ्यांना शासकीय नियमाप्रमाणे किमान वेतन आणि इतर मूलभूत सेवा सुविधा ज्या आवश्यक आहेत त्या उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, उदाहरणार्थ पार्किंग व्यवस्था शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदी इतर महत्त्वाच्या सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज असणे यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(२) **श्री.सचिन अहिर**, डॉ.मनिषा कायंदे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई मेट्रोची कारशेड कांजूरमार्ग येथून पुन्हा आरेच्या जंगलात करण्यासंदर्भात शासनाने घेतलेला निर्णय, सदर निर्णयास पर्यावरणवादी यांनी केलेला विरोध, मेट्रो ६ मार्गिककेचे कारशेड कांजूरमार्ग येथील जागेवर प्रस्तावित असणे, मेट्रो कारशेडसाठी कांजूर येथील सुमारे १५ हेक्टर जागेची आवश्यकता असणे, तत्कालिन महाविकास आघाडी सरकारने मेट्रो ३ चे कारशेड आरे येथून कांजूरमार्गला स्थलांतरित करण्याचा घेतलेला निर्णय, मुंबईतील मेट्रो रेल्वेचे कारशेड कोणत्या ठिकाणी असावे, याबाबत अभ्यास करुन राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांच्या उच्चस्तरीय समितीने दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास अहवाल तयार करणे, अभ्यासपूर्ण अहवालासाठी समितीने गोरेगांव आरे येथील प्रस्तावित ठिकाणी भेटी देणे, मेट्रो रेल्वेचे टप्पा-३ कारशेड आरे येथे उभारल्यास त्याठिकाणी एक हजार झाडे तोडल्याने जंगलाची हानी होणे, असा निष्कर्ष समितीने काढणे, अतिरिक्त कारशेड साठी पुढील काळात पुन्हा वृक्ष तोड होण्याची शक्यता, त्यामुळे मेट्रो रेल्वेची कारशेड आरे ऐवजी कांजूरमार्ग येथे केल्यास संयुक्तिक होईल, अशी शिफारस सदर समितीने करणे, राज्यात नुकतेच सत्तांतर झाल्यानंतर कांजूरमार्ग ऐवजी आरे गोरेगांव येथे कारशेड उभारण्याचा निर्णय घेण्यात येणे, परिणामी सामान्य जनतेच्या पैशांचा होत असलेला अपव्यय, मुंबईतील हरितपट्टे, पाणथळ जागा तसेच नद्यांचे पाणलोट क्षेत्रही नष्ट करण्याची शासनाची भूमिका, शासनाची पर्यावरणविरोधी भूमिका असल्याने पर्यावरणप्रेमीमध्ये प्रचंड संतापाची व

चिडीची निर्माण झालेली भावना, शासनाच्या बदललेल्या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर अतिरिक्त बोजा पडणे, आरे येथील वृक्षांची हानी होणे, मेट्रोची कारशेड उभारण्याच्या संदर्भात फेरविचार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

**(३)** **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, कपिल पाटील, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री जयंत आसगावकर, किरण सरनाईक, बाळाराम पाटील, किशोर दराडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रिय निवासी २८८ आश्रमशाळांना राज्यसरकारने मान्यता देणे, या सर्व शाळा नियमित सुरु असून त्यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या सर्व शाळांना शासनाने अनुदान द्यावे, ही सातत्याने मागणी होत असणे, मराठवाड्याचा शिक्षक लोकप्रतिनिधीनी यापूर्वी प्रत्येक अधिवेशनामध्ये याविषयी शासनाचे लक्ष वेधले, तत्कालीन मंत्रीमहोदयांनी या सर्व शाळांची तपासणी करुन अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे, आश्वासित करणे, त्यानुसार वारंवार तपासणी करुन अ, ब, क, ड अशी श्रेणी करणे, या श्रेणीनूसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेणे, अनेक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या शाळांना प्रत्यक्षात वेतनअनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**(४)** **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक २१ डिसेंबर,२०१९ च्या शासन निर्णयाद्वारे अनुसूचित जमातीच्या कायम कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे हजारो कर्मचारी लाभापासून आणि ३१ महिने होऊनही पेन्शन व फॅमिली पेन्शनपासून वंचित झाले असणे, मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.८९२८/२०१५FCL v/s Jagdish Dahira & Other यामध्ये दिलेल्या निर्णयामध्ये पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यासंदर्भाने शासनाला आदेश दिलेला नसतांना सुध्दा जात प्रमाणपत्राच्या खरेखोटेपणाची तपासणी न करता सरसकट जात प्रमाणपत्र अवैध करण्याचा सपाटा लावणे, त्यामुळे हजारो न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात आली असणे, तसेच शासनाने मानवतेचा दृष्टीकोन गृहीत न धरता राज्यातील वेगवेगळया विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनवर गदा आली

अप्रकाशित प्रत

असणे, हे अन्यायकारक असून मागील सरकारच्या मंत्रीमहोदयांच्या समितीचा अहवाल शासनाकडून सुपूर्द करण्यात आला असणे, त्यासंदर्भात मागील सरकारच्या मंत्रीमंडळाचा हा अहवाल ठेवण्यापूर्वीच सरकार बदलल्यामुळे हा मुद्दा प्रलंबित असणे, हजारो कर्मचाऱ्यांच्या कुटूंबाला पेन्शन आणि इतर लाभ न मिळाल्यामुळे त्यांना हालअपेष्टा सहन कराव्या लागणे, याबाबत आपल्या राज्यातील सर्वसामान्य कर्मचाऱ्यांच्या कुटूंबाचा सहानुभूतिपूर्वक विचार करुन त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व यावर प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री अंबादास दानवे,** कपिल पाटील, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री विलास पोतनीस, सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि उच्च शिक्षणाकरिता भाडे तत्वावर भूखंड घेऊनही त्यावर कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम केलेले नसल्याचे बाब माहे ऑगस्ट, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, सदरहू आरक्षित भूखंड हे विविध संस्थांना सन २०१० मध्ये महानगरपालिकेने विकास योजनेतील भूखंड तसेच सुविधा भूखंड, शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित करुन वितरीत केलेले असणे, महानगरपालिकेने संस्थेशी केलेल्या भाडेपट्टा कराराच्या तारखेपासून पुढील दोन वर्षांच्या कालावधीत इमारत बांधकाम पूर्ण करुन शिक्षण सुरु केले नाहीतर भाडेपट्टा करार रद्द समजण्यात येईल अशा अटींचा समावेश उक्त करारात असो, सदरहू भूखंडावर कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नसल्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागणार असल्याने स्थानिक विद्यार्थ्यांमध्ये तसेच त्यांच्या पालकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाचे वातावरण, भूखंड वितरीत केल्यानंतर आजपावेतो उक्त भूखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम न करणाऱ्या संस्थांकडून भूखंड परत घेण्याची होत असलेली मागणी, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने केलेली कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका."

(६) **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी राज्यातील वैधानिक विकास मंडळांची मुदत संपली असणे, प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र या विभागातील सर्व क्षेत्रातील असमतोल दूर

अस्वाक्षरित प्रत

करण्यासाठी घटनेत विशेष तरतूद करुन या मंडळांची स्थापना करण्यात आलेली असणे, अद्याप या सर्व विभागातील अनुशेष शिल्लक असताना अवैधानिक कारणांसाठी राज्यातील वैधानिक विकास मंडळांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव मागील सरकारने प्रलंबित ठेवला असणे, मराठवाडा विकास मंडळास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी मराठवाडय़ातील ३५ खासदार-आमदारांनी व मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने केलेली असणे, तसेच कोकण आणि उत्तर महाराष्ट्रासाठी वेगळी विकास मंडळे निर्माण करण्यास कुणाचाही विरोध नसणे, तशाप्रकारचा स्वतंत्र प्रस्ताव पाठवण्याचा पूर्ण अधिकार सरकारला असणे, तथापि, मुदतवाढीचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याच्या मागील सरकारच्या कृतीमुळे मागास भागातील जनतेवर प्रचंड मोठा अन्याय होत असणे, राज्य सरकारने तातडीची बाब म्हणून वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याबाबतचा तसेच कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव अतिशीघ्रतेने केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत असणे, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री अमोल मिटकरी**, शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अकोट उपविभागातील अकोट ते पोपटखेड (जि.अकोला) रस्त्यावर बेकायदेशीर व अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक होत असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदर बेकायदेशीर वाहतुकीमुळे अकोट तालुक्यातील व अकोला जिल्हयातील घरकुलांच्या बांधकामासाठी रेती मिळत नसल्याने खाजगीरित्या अव्वाचे सव्वा भावाने नागरिकांना रेती विकत घ्यावयाची येत असलेली पाळी, अवैधरितीने मुरुम, गिट्टीचे उत्खनन करण्यांत येत असताना वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नंबर प्लेट नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शासनाला स्वामित्वधनापासून (रॉयल्टी) करोडो रुपयांचे होत असलेले नुकसान, तसेंच अकोट-पोपटखेड रस्त्यांवर होणाऱ्या अवैध वाहतुकीमुळे सदर रस्त्यांची बांधकाम विभागाला करावी लागत असलेली डागडुजी व त्यामध्ये निविदाच्या नावांखाली अधिकारीवर्गांकडून होत असलेला आर्थिक गैरव्यवहार, परिणामी, याप्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन चौकशी करण्याची आवश्यकता व त्यानुसार करण्यांत आलेली वा करावयाची कार्यवाही."

अस्सुधारित प्रत

**(८)** **डॉ.परिणय फुके**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गोंदिया जिल्ह्यातील तेंदूपत्ता कामगारांना गेल्या २ वर्षांपासून बोनस दिला जात नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सन २०२० मध्ये तेंदूपत्तापासून वन विभागाला रॉयल्टीच्या रूपात कमी महसूल मिळाल्याने सरकारने अद्याप बोनस किंवा यासंबंधीची कोणतीही माहिती जाहीर केली नसणे, त्यामुळे तेंदूपत्ता मजूर बोनसच्या प्रतिक्षेत असणे, वन विभागाला बहुतांश महसूल तेंदूपत्ताच्या माध्यमातून रॉयल्टीच्या स्वरूपात मिळणे, महिनाभर कामगारांना तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी रोजगार उपलब्ध करण्यात येणे, एका महिन्यात एका मजुराला १५ हजारांहून अधिक मजुरी मिळणे, विकलेल्या तेंदूपत्तावरील बोनस वनविभागामार्फत तेंदूपत्ता मजुरांच्या खात्यात जमा केला जाणे, परंतु सन २०२० चा बोनस अद्यापही मजुरांना देण्यात आलेला नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, शासनाने तातडीने या मजुरांना बोनस देऊन त्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, यावर शासनाने घ्यावयाचा निर्णय व करावयाची कार्यवाही."

**(९)** **श्री.कपिल पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सरकारी-निमसरकारी आणि खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि ज्युनियर आणि सीनियर कॉलेजातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची हजारो पदे रिक्त असणे, रिक्त पदांची माहिती दडवून ठेवण्यात येणे, शालेय शिक्षण विभागातील मंजूर पदांना ३० टक्के कपात लावणे, कला-क्रीडा शिक्षकांची पदे संपुष्टात आणणे, संचमान्यतेचे निकष बदलून भाषा व गणित-विज्ञानाचे विषयनिहाय शिक्षकांची पदे संपुष्टात आणणे, समाजशास्त्र विषयाची पदे संपुष्टात आणणे, आरटीईनुसार प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक पदांची निर्मिती न करणे, परिणामी लक्षावधी विद्यार्थ्यांचे विज्ञान, गणित, इंग्रजी, समाजशास्त्र या विषयांचे अतोनात नुकसान होणे, अतिथी निदेशक आणि कंत्राटी शिक्षक नावाने शिक्षकांचे शोषण करणे, आयसीटी-आयटी शिक्षकांना अनुदानित मंजूर पदांना मान्यता न देणे, आरटीई कायद्यानुसार विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शिक्षण फी प्रतिपूर्ती करण्याची आवश्यकता असणे, एससी, एसटी, ओबीसी, भटके विमुक्त, अजात विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन फी प्रवेशाच्या वेळी अदा न करणे, अप्पर प्रायमरी आणि माध्यमिक शाळांना आरटीई आणि राज्य अधिनियमानुसार विषय शिक्षक व कला, क्रीडा शिक्षकांसह संचमान्यता

अप्रकाशित प्रत

मंजूर करण्याची गरज असणे, व्यपगत करण्यात आलेली शिपाई व शिक्षकेतर पदे तात्काळ पुर्नस्थापित करण्यात न येणे, नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार वेतनेतर अनुदान सातव्या वेतन आयोगानुसार देण्याची आवश्यकता असणे, मानसेवी शिक्षकांच्या नियुक्ती कालावधीत व मानधनात वाढ न करणे, आयसीटी-आयटी शिक्षकांना नाममात्र वेतन देणे, समग्र शिक्षा अंतर्गत मिडिया अँड एंटरटेनमेंट हा विषय सुरु ठेवण्याची NSQF ने मान्यता देऊनही व्यवसाय प्रशिक्षकांना नियुक्ती देण्यात न येणे, १ लाख ९२ हजार डी.एड./बी.एड./टीईटी धारक उमेदवार नोकरीच्या प्रतिक्षेत असणे, दीड लाख शिक्षक/शिक्षकेतर रिक्त पदांची भरती प्रक्रिया बंद असणे, यामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक दर्जावर परिणाम होणे, बेरोजगार डी.एड./बी.एड. धारकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष व संताप, याबाबत शासनाची भूमिका आणि शासनाने करावयाची कार्यवाही."

(१०) **डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील आदिवासी भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे, त्यामुळे हाताला कामे नसणे, रोजगारासाठी सतत स्थलांतर करावे लागणे, त्यामुळे लहान मुलांची हेळसांड होऊन ही मुले कुपोषणाला बळी पडून ती मृत्यूंच्या दारात पोहचणे, राज्यातील आदिवासी भागातील लहान मुलांचे कुपोषणामुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असून गेल्या दोन महिन्यात कुपोषणामुळे ३९ बालकांचा मृत्यू झाला असल्याचे दिनांक ५ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या लहान मुलांचे वास्तवात कुपोषणामुळे मृत्यू झालेले असतानाही शासन-प्रशासन ते मान्य करीत नसणे, या लहान मुलांच्या मृत्यूला वैद्यकीय कारणे देऊन हे बालमृत्यू लपविले जाणे, राज्यातील काही भागात ही कुपोषित आणि गर्भवती उपचार मिळण्यासाठी शासनाने विविध ठिकाणी सेंटर्स उभारण्यात येणे, आदिवासींसाठी आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी त्या-त्या भागात जागाही देण्यात येणे, पण तेथे काम करायला कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी तयार नसणे, यामुळे शासनाप्रती जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि राज्य शासनाने प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

अप्रकाशित प्रत

**सात : मा. उप सभापती यांचा प्रस्ताव –**

"ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, माजी खासदार व माजी आमदार डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांच्या शतकपूर्ती निमित्त त्यांच्या संसदीय व सामाजिक कार्याचा गौरव करण्याबद्दलचा प्रस्ताव"

**आठ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**सर्वश्री सचिन अहिर,** नरेंद्र दराडे, डॉ. मनीषा कायंदे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"मुंबईतील तसेच मुंबई बाहेरील गिरण्या अनेक वर्षापासून बंद असून या बंद गिरण्यांच्या जमिनीवर असलेल्या इमारतीमध्ये जवळजवळ दोन पिढया म्हणजेच ५० वर्षापेक्षा जास्त काळ ४००० भाडेकरु वास्तव्यास असणे, परंतु सध्या या इमारतीची अवस्था कोणत्याही क्षणी कोसळून मोठी जिवीतहानी होण्याचा धोका निर्माण होणे, याकरिता मुंबई विकास नियमावली ५८ (७) १९९१ अंतर्गत गिरणी मालकांनी या इमारतीचे पुनवर्सन करुन भाडेकरुंना देण्याची अट घालण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने लक्ष घालून ज्याप्रमाणे घरकुल योजनेअंतर्गत घरे बांधून दिली त्याच धर्तीवर गिरण्यांमधील कामगारांचे म्हाडा अंतर्गत पुनवर्सन करण्याचे धोरण आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची कार्यवाही व भूमिका."

## - मध्यंतर –

**नऊ : शासकीय विधेयके –**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, अभिजीत वंजारी, सतिश चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अस्वाक्षरित प्रत

**(२)** "सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १७ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२"
**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, अभिजीत वंजारी, सतिश चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक १७ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

दहा : **सर्वश्री अंबादास दानवे**, अमरनाथ राजूरकर, एकनाथ खडसे, अभिजित वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब, सर्वश्री सतीश चव्हाण, सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री विलास पोतनीस, जयंत आसगावकर, किरण सरनाईक, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री शशिकांत शिंदे, सतेज उर्फ बंटी पाटील, अब्दुलाखान दुर्राणी, आमश्या पाडवी, राजेश राठोड, सचिन अहिर, नरेंद्र दराडे, डॉ.मनिषा कायंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव —**

"राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, घरफोड्या, जुगार व अपहरणाच्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, ज्येष्ठ नागरिकांच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, गुटख्याची तस्करी, वाहतूक, साठवण व विक्री जोमात सुरु असणे, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पोलिसांच्या बेदरकार वृत्तीमुळे गोंदिया जिल्ह्यात एका महिलेवर नराधमांनी वारंवार केलेला अत्याचार, पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कोथूर्णे गावातील अल्पवयीन मुलीवर अमानुष अत्याचार करुन मृतदेह झुडपात फेकून दिला असणे, संपूर्ण देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सहा नराधमांनी अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली असणे, भद्रावती येथे आश्रमशाळेत शिक्षकाने विद्यार्थीनीवर चाकूचा धाक दाखवून बलात्कार करणे, अशाच प्रकारच्या घटना बीड, मावळ, मुंबई व अन्य ठिकाणी एकामागोमाग घडल्यामुळे महिला, मुली यांच्यात पसरलेले भीतीचे व चिडीचे वातावरण, ठाणे येथे महिला पोलीस कर्मचाऱ्याने केलेली आत्महत्या, डान्स बारला आळा घालण्यात आलेले अपयश, खुद्द

अग्रिम प्रत

मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवासस्थानापासून हाकेच्या अंतरावर कोपरी, कापुरबावडी व इतर परिसरात डान्सबार सुरु असल्याची बाब माध्यमांनी उघडकीस आणलेली असणे, पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणाची स्वतंत्र एसआयटी नेमून चौकशी करण्याची आवश्यकता, सायबर गुन्हेगारांनी अनेकांची केलेली फसवणूक, मुंबईतील खार येथे दिवसाढवळ्या गोळीबार करुन दहशत निर्माण करण्याचा केलेला प्रयत्न, गुंड टोळयांच्या वाढत्या प्रमाणामुळे निर्माण झालेले दहशतीचे वातावरण, सत्ताबदल झाल्यानंतर सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांकडून शासकीय अधिकारी यांना करण्यात आलेली मारहाण तसेच चिथावणीखोर वक्तव्यांमुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची निर्माण झालेली शक्यता, गुंडांचे झालेले उदात्तीकरण, कोथरुड, पुणे येथे कामगाराला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून लाथाबुक्क्याने अमानूष मारहाण करण्यात आलेली असणे, भ्रष्टाचार, खंडणी व अन्य कारणांसाठी निलंबित करण्यात आलेल्या काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना चौकशी पूर्णत्वास जाण्याअगोदरच सेवेत घेतल्याने, प्रामाणिक अधिकाऱ्यांचे झालेले खच्चीकरण तसेच भ्रष्ट अधिकाऱ्यांचे वाढलेले मनोबल, मागील काळात सामाजिक तेढ निर्माण करण्याच्या घटना घडल्या असून त्यास कारणीभूत असलेल्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता असणे, मुंबई व आसपासच्या परिसरात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, रेल्वे हद्दीतील गुन्हेगारीत झालेली प्रचंड वाढ, लोकप्रतिनिधीना दलालांमार्फत दाखविण्यात आलेले अमिष, पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होत नसणे, मुंबई व उपनगरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रकल्प दोन वर्षांपासून प्रलंबित असणे, तसेच, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या योजना, सेसच्या इमारतींच्या पुनर्विकास योजना आणि अन्य पुनर्विकास, अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे अर्धवट स्थितीत असून विस्थापित झालेल्या रहिवाश्यांना विकासकांकडून घरभाडे देखील अदा केले जात नसणे, झोपडपट्टी पुनर्विकास करताना एक अधिक एक मजला असल्यास पहिल्या मजल्यावरील रहिवासी मालमत्ता कर, लाईट बिल भरत असल्यामुळे त्यांनाही पात्र समजून लाभ देण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, अवैध वाळू व मुरुम उत्खनन माफियांचा सर्रास गैरप्रकार व दादागिरी वाढणे तसेच उप विभागीय अधिकारी, प्रांत व तहसीलदार यांच्यावर वाळू माफियांकडून प्राणघातक हल्ले वाढणे, मुंबई, व राज्यातील इतर अनेक भागात, विशेषत: ठाणे जिल्ह्याच्या प्रवेश मार्गात खड्डेमय रस्त्यामुळे वाहतुक खोळंबून सर्वसामान्यांना होणारा प्रचंड त्रास, मुंबईच्या पश्चिम व पूर्व

अप्रकाशित प्रत

द्रुतगती महामार्गावर सकाळी व सायंकाळी होणारी वाहतूक कोंडी, अपघातांचे वाढलेले प्रमाण, नगरपालिका व महानगरपालिका प्रभाग रचना बदल करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे यंत्रणेवर पडलेला बोजा, खर्चात झालेली वाढ व राजकीय कारणासाठी निर्णय घेतला असल्याबाबत जनतेच्या मनात शंका निर्माण झाली असणे, अनावश्यक बुलेट ट्रेनकरिता मुंबई व आसपासच्या कोट्यवधी रुपयांच्या जागा कवडीमोल भावाने दिल्या जाणे आणि शासकीय तिजोरीवर नाहक सहा हजार कोटी रुपयांचा बोजा पडला असणे, पर्यावरण तज्ज्ञ व पर्यावरणप्रेमींचा ठाम विरोध असतानाही आरे येथे कारशेड उभारण्याकरिता पुन्हा बेकायदेशीररित्या झाडे तोडण्याचे काम सुरु केले असणे, तसेच राज्यात कोविड विषाणू प्रादुर्भाव पुन्हा जोर धरु लागला असणे आणि मंकी पॉक्स, झिका व्हायरस, लेप्टो व मलेरीया, हत्तीरोग, स्वाईन फ्ल्युच्या आजारांनी थैमान घातले असताना प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात सरकारला आलेले अपयश, पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील एका आदिवासी गर्भवती महिलेला आरोग्य व दळणवळणाच्या सुविधा वेळेत न मिळाल्याने नवजात जुळ्या मुलांचा डोळ्यादेखत झालेला दुर्देवी मृत्यू, राज्यात कोणत्याच शासकीय विभागांना ४६ दिवस मंत्री नसल्यामुळे एकंदरीत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, तसेच राज्यात शालेय शिक्षण विभागामार्फत शिक्षकांच्या टीईटी परीक्षेत, निवड व भरती प्रक्रियेत सनदी अधिकारी, संचालक, संस्था चालक व त्यांचे पदाधिकारी यांचे आर्थिक हितसंबंध असल्याची गंभीर बाब निदर्शनास आलेली असणे, लोकप्रतिनिधींच्या मुला-मुलींच्या नावाचा समावेश असल्याचेही उघड झाले असणे, तसेच पेट्रोल व डिझेलची केलेली अपुरी करकपात आणि केंद्र व राज्यसरकारच्या चुकीच्या धोरणामुळे, प्रचंड प्रमाणात वाढलेली महागाई, परिणामी हातावर पोट असणाऱ्या, गरीब, सामान्य नागरिकांना दैनंदिन जीवन जगणे जिकरीचे झाले असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा** : **(मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, राजहंस सिंह, चंद्रशेखर बावनकुळे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री श्रीकांत भारतीय सुरेश धस, डॉ.परिणय फुके, डॉ.रणजित पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री गोपिचंद पडळकर, प्रविण दटके, प्रा.राम शिंदे, सर्वश्री प्रविण पोटे पाटील,

असुधारित प्रत

निलय नाईक, वसंत खंडेलवाल, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून मागील काळात मुंबई शहराच्या तसेच एमएमआर भागातील मुलभूत पायाभूत सुविधांची पुर्णपणे दुरवस्था झालेली असणे, मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण किवा परिवहन (गतीशीलता) हे महत्वाचे मुद्दे असून मुंबई शहराकरिता २८६ कि.मी.च्या मेट्रोचे काम धीम्या गतीने झाल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी मेट्रोचा खर्च १० हजार कोटीने वाढून मुंबईकरांना मेट्रोपासून वंचित ठेवण्यात येणे, मागील काळात एसआरएच्या माध्यमातून १५ लाख घरे उपलब्ध होण्याची आवश्यकता असताना फक्त २ लाख घरांची निर्मिती एसआरएच्या माध्यमातून झाल्याचे निर्दशनास येणे, एसआरएमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचारामुळे झोपडपट्टी पुर्नविकास प्रकल्प प्रलंबित असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची प्रगती न होणे, २०११ पर्यंत सर्व झोपडपट्टीतील घरांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे देण्याचा कायदा होऊनही सदर कायद्याची अंमलबजावणी न होणे, पत्राचाळ पुर्नविकास प्रकल्पातील भाडेकरूंना बेघर करून त्यांना भाडे न मिळणे, तसेच, बी.डी.डी. चाळीचा खोळंबलेला पुर्नविकास, धारावीचा खोळंबलेला पुर्नविकास पोलीसांकरिता मोफत घरांच्या धोरणाची अंमलबजावणी न होणे, मुंबई शहरातील गावठाण व कोळीवाडयाकरिता विशिष्ट डी.सी. आर. अद्याप तयार न होणे, तसेच विमानतळाच्या आजूबाजूच्या परिसरातील फनेल झोनमधील पुर्नविकास खोळंबला असणे, गिरणी कामगार व पोलीसांच्या घरकुल योजनेमध्ये संथगतीने झालेली प्रगती, केंद्र शासनाच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्यांचा पुर्नविकास न होणे, तसेच रेल्वेच्या जमिनीवरील झोपडपट्टीवासियांना संरक्षण न मिळणे व वन जमिनीवरील रहिवाशांना पायाभूत सुविधांपासून वंचित रहावे लागणे, अशा अनेक प्रकारच्या घरकुल योजनांमध्ये व एसआरए आणि म्हाडामध्ये झालेल्या भ्रष्टाचारामुळे हा विकास खोळंबलेला असणे, एसआरए व म्हाडामध्ये विशेष करून गेल्या अडीच वर्षामध्ये प्रति चौरस फुटाच्या किंमतीचा बाजार मांडलेला असणे, तसेच, गेल्या २५ वर्षांमध्ये मोठया प्रमाणावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार व गैरव्यवस्थापन परिणामी मुंबईकरांच्या स्वप्नातील मुंबई दृष्टोत्पतीस न येणे, रस्त्यांमधील चरभरणी, उद्याने व बाजारांमध्ये तसेच कोविड कालावधीत सुध्दा मोठया प्रमाणात गैरव्यवहार उघडकीस आला असून गेल्या २५ वर्षातल्या मुंबई महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवहाराची मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी नेमण्याची आवश्यकता, तसेच, विशेष सीएजी

(कॅग) ऑडिट करण्याची आवश्यकता, मोठया प्रमाणावर गेल्या २ महिन्यांमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या संगणक खरेदीमध्ये घोटाळा झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक २७ वस्तू अद्यापपर्यंत मिळाल्या नसणे, त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर होणारा दुष्परिणाम, तसेच मुंबईची मेट्रो ही मास ग्रीन ट्रान्सपोटेशन सिस्टीम असून मेट्रोचे काम थांबल्यामुळे मुंबईच्या पर्यावरणाचा झालेला ऱ्हास तसेच पवई तलावामध्ये सायकल ट्रॅक करण्याचा अट्टाहास, त्यामुळे मुंबईच्या पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, मुंबई शहराच्या कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट होत नसल्यामुळे मुंबईचे वातावरण व हवामान प्रदुषित होत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच मुंबई शहरातील शासकीय जमिनीवर असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांना आकारण्यात आलेला अकृषीक कर पूर्णपणे वगळण्याची आवश्यकता, मुंबईच्या कोळीवाडा व गावठाणाकरिता वेगळा डीसीआर तयार करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिल्यामुळे मुंबईचे कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था, मुंबई शहरामध्ये पोलिसांची संख्या कमी असल्यामुळे खास करुन मुंबई पोलिसांची भरती करण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा राबविण्याची आवश्यकता, तसेच माहे नोव्हेंबर, २०१९ ते जुन २०२२ या कालावधीमध्ये गृहविभागात मोठया प्रमाणात झालेला भ्रष्टाचार, गैरव्यवहार व अनियमितता झालेली असून यासंदर्भात शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**बारा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री सतिश चव्हाण**, विक्रम काळे, अमरनाथ राजूरकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील :-

"खुलताबाद ते म्हैसमाळ (जि.औरंगाबाद) या ११ कि.मी.रस्त्याच्या कामासाठी ४ वर्षापुर्वी रुपये ३४ कोटी शासनाने मंजूर केले असणे, सदर कामांवर रुपये ११ कोटी खर्च करण्यात आला असणे, तरीही सदरहू रस्त्याची दुरवस्था झालेली असणे, रस्त्यांच्या कामापोटी ठेकेदारास रुपये ११ कोटींचे देयक अदा करुनही ठेकेदाराने रस्त्यांची कामे अपूर्ण ठेवली असणे, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे म्हैसमाळ येथे येणाऱ्या भाविकांचे व पर्यटकांचे प्रमाण घटले असणे, त्यामुळे स्थानिकांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असणे, सदर रस्त्याचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करुन रस्त्याचे काम पूर्ण करण्याची स्थानिकांकडून मागणी होत असणे, याबाबत खुलताबाद ते म्हैसमाळ रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने

करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, नरेंद्र दराडे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील :-

"मुंबईत म्हाडाच्या अनेक उपकर प्राप्त इमारती जुन्या व जीर्ण झाल्याने इमारती कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, याप्रकरणी शासनाकडे अनेकदा तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नसणे, विकास नियंत्रण नियमावली (डीसीआर) मध्ये झालेल्या बदलामुळे विकासकांकडून पुनर्विकासामध्ये विलंब होत असणे, मुंबईतील विशेषत: दक्षिण मुंबईतील इमारतींची देखभाल, दुरुस्ती झाली नसल्याने दुरवस्थेत असलेल्या धोकादायक इमारतीत रहिवाशांना वास्तव्य करावे लागत असणे, पावसाळ्यापूर्वी सर्वेक्षणात यातील अनेक इमारती धोकादायक असल्याचे निष्पन्न झाले असणे, सदरहू इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाने भरीव विशेष निधी म्हाडास उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, सदरहू इमारतींच्या दुरुस्तीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण झाला असणे, याबाबत मुंबईतील मोडकळीस आलेल्या शेकडो उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**तेरा** : **"निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप"**

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२२

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद